
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 7 | ISSUE - 2 | NOVEMBER – 2017

# सनातनवादी-नवसनातनवादी आणि संतांच्या विचारांतील कल्याणाचे अर्थशास्त्र




**प्रतिभा लक्ष्मणराव मस्के**
**संशोधक विद्यार्थीनी,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद.**

## प्रस्तावना :-

मानवाने आपल्या गरजा व विकासासाठी अनेक शास्त्रांची निर्मिती केलेली आहे. त्यात अर्थशास्त्र हे अत्यंत महत्त्वाचे सामाजिक शास्त्र आहे. यात मानवाच्या आर्थिक प्रश्नांचा व याविषयी योग्य उपाययोजना कशा प्रकारे केल्या जाऊ शकतात याबाबतचे सविस्तर विश्लेषण हा अर्थशास्त्राचा मूळ अभ्यास विषय आहे. १७७६ मध्ये **'ॲडम स्मिथ'** यांनी **'राष्ट्राची संपत्ती'** हा ग्रंथ लिहिला व अर्थशास्त्राला एक स्वतंत्र शास्त्र म्हणून मान्यता मिळाली. त्यांनी ''राष्ट्राच्या संपत्तीचे स्वरूप व तीची कारणमीमांसा करणारेत शास्त्र म्हणजेच अर्थशास्त्र होय.'' अशी अर्थशास्त्राची व्याख्या केली. त्यापुढे १८९० मध्ये डॉ. अल्फ्रेड मार्शल यांनी 'अर्थशास्त्राची मुलतत्त्वे' हा ग्रंथ लिहिला आणि अर्थशास्त्राचा मुळ उद्देश हा मानवाचे कल्याण साध्य करणे असा आहे हे स्पष्ट केले. १८९० नंतर अनेक अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक कल्याणाचे विचार मांडले. यात प्रो. पिगु, प्रा. पॅरेटो, प्रा. लर्नर, प्रा. कॅल्डोर, प्रा. सायटोबस्की, प्रा. हिक्स, प्रा. रिडर, प्रा. केनिथ ॲरो, डॉ. अमर्त्य सेन, प्रा. बाबर व हसन इत्यादी. प्रा. मेलविन रिडर यांच्या मते, ''कल्याणकारी अर्थशास्त्र हे आर्थिक विज्ञानाची अशी शाखा आहे की, जी व्यवहार औचित्याचे मापदंडांना स्थापन करते आणि त्यांना आर्थिक धोरणात लागू करते.'' प्रा. एडविन कॅनन त्यांच्या 'Wealth' या पुस्तकात, ''मानवाचे भौतिक कल्याण निश्चित करणाऱ्या निरनिराळ्या कारणांचे स्पष्टीकरण करणे हा अर्थशास्त्राचा मुख्य उद्देश आहे.'' तसेच प्रो. आयुर्विन पिगु यांच्या मते, ''व्यक्तीला मिळणारे सर्व मार्गापासूनचे एकूण समाधान म्हणजेच त्या व्यक्तीचे कल्याण होय.'' कोणतेही कल्याण हे गरीबांच्या हातातील वास्तविक उत्पन्न वाढविते त्यामुळे आधारावर अर्थव्यवस्थेच्या कार्यक्षमतेचे म्हणजे आदर्शात्मक अध्ययन असल्याचे स्पष्ट केले आहे. डॉ. अमर्त्य सेन यांनी दारिद्रय आणि भूकेचे कल्याणकारी काही अटी पूर्ण केल्यानंतर व्यक्तीच्या निवडीसाठी बेरजेवरून सर्व समाजाची निवड निश्चित करताना लोकशाहीची मोडतोड करून लोकांचे व्यक्तीस्वातंत्र्य व त्यांचे हक्क हिरावून घेण्याची आवश्यकता नाही. थोडक्यात, तत्त्वज्ञानाची कास न सोडता श्रमप्रधान उत्पादन तंत्राला सेन यांनी महत्त्व दिले.

## कल्याणप्रधान अर्थशास्त्र :-

अर्थशास्त्र सामाजिक शास्त्र असल्यामुळे अर्थशास्त्राच्या अभ्यासाची मूळ प्रेरणा समाजाच्या आर्थिक समस्यांची उकल करून त्यांच्यावरील परिणामकारक उपयांचा शोध घेणे ही असते. अशी मार्शल, पिगू या श्रेष्ठ विचारवंतांची भूमिका आहे. या विचारसरणीतून कल्याणप्रधान अर्थशास्त्र विकसित झाले आहे.

अर्थशास्त्रीय विश्लेषणाच्या ज्या शाखेत 'महत्तम सामाजिक हित' साधू शकेल असे धोरण निवडण्यासाठी निकष निश्चित केले जातात. त्या शाखेस 'कल्याणप्रधान अर्थशास्त्र' म्हणता येईल. कल्याणकारी अर्थशास्त्राचे वेगवेगळे संप्रदाय निर्माण झाले आहेत.

## १) सनातनवादी कल्याणाचे अर्थशास्त्र :-

परंपरावादी अर्थशास्त्रज्ञांनी विशेष असे कल्याणाच्या सिद्धांताचा विकास केला नाही. ॲडम स्मिथच्या राष्ट्राची संपत्ती (Wealth of Nation) या ग्रंथात कल्याणाची कल्पना आढळते. त्यांच्या मते, राष्ट्राच्या भौतिक उत्पादनात वाढ झाल्यास कल्याणात वाढ होते. पण कल्याणकारी अर्थशास्त्राचे प्रथम विश्लेषण अर्थतज्ज्ञ प्रो. मार्शल प्रो. पिगू, प्रो. सिडवीक इ. नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी '(Neo-Classical

Economists)' केले. अर्थात यापूर्वीही प्रो. बॅथम, प्रो. हॅबसन, प्रो. हेन्री क्ले. इ. अर्थशास्त्रज्ञांनी कल्याणाचे कमी-जास्त विश्लेषण केले होते. तथापि, ही संकल्पना व्यवस्थित मांडण्याचे कार्य प्रो. पिगू यांनी केले.

## नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञ '(Neo-Classical Economists)':-

### अर्थतज्ज्ञ प्रो. मार्शल :-

व्यवहारवाद हे मार्शलच्या अर्थशास्त्राचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. व्यवहारात उपयोगी पडतील असे अर्थशास्त्रीय सिद्धांत मांडता यावेत म्हणून त्यांनी भौतिक कल्याणावर म्हणजे भौतिक वस्तूसेवांपासून मिळणाऱ्या साधनांवर लक्ष केंद्रित केले व वास्तव निरपेक्ष समग्रसमतोल पद्धती ऐवजी "अंशलक्षी समतोल पद्धतीचा अंगीकार केला." त्यांच्या कल्याणप्रधान अर्थशास्त्राच्या विश्लेषणाचे मुख्य साधन 'लाभाधिक्याची कल्पना' होय.

मार्शलच्या लाभाधिक्य कल्पनेत समग्र निरपेक्ष लाभाधिक्याकडून (Aggregate Absolute Surplus) मूलभूत स्वरूपाचे परिवर्तन झालेले दिसते. प्राप्त परिस्थितीत आर्थिक व्यवहारामधून समाजाला मिळणाऱ्या एकूण समाधानाचे, त्या व्यवहारासाठी लागणारे कष्ट व त्यागातून उत्पन्न होणाऱ्या या समाधान हानीपेक्षा असणारे आधिक्य असा एकूण निरपेक्ष लाभाधिक्याच्या संबोध मार्शलने मांडला आहे. 'वस्तू हातची जाऊ नये म्हणून ग्राहकाने देऊ केलेली किंमत व वस्तूच्या खरेदीसाठी त्याला प्रत्यक्षात द्यावी लागणारी किंमत यातील अंतर' अशी या लाभाधिक्याची मार्शलने व्याख्या केली असून त्यास 'ग्राहकाचे लाभाधिक्य' (Consumer Surplus) असे नाव दिले आहे. या व्याख्येनुसार उपभोग्य उत्पन्न, त्याची अभिरूची व इतर वस्तूंच्या किंमती स्थिर असतील आणि विचाराधीन वस्तूंवरील खर्च एकूण खर्चाचा अल्पांश असेल तर गृहीत वस्तूची किंमत कमी झाली तर लाभाधिक्य वाढेल व किंमत वाढल्यास लाभाधिक्य कमी होईल. अशा तऱ्हेने वस्तूची उपलब्धता व किंमतीतील बदल यांच्यावर हे लाभाधिक्य अवलंबून असल्याने त्यास सापेक्ष लाभाधिक्य म्हणता येईल व त्यातील बदलाच्या आधाराने विशिष्ट धोरणामुळे घडून येणारा सामाजिक स्थितीतील इष्ट किंवा अनिष्ट हे ठरविता येईल.

## प्रो. पिगू यांचे 'कल्याणकारी अर्थशास्त्र' (Prof. Pigovian Welfare Economics):-

मार्शलच्या विचारांचा वारसा घेऊन प्रो. पिगूने अर्थशास्त्रात कल्याणकारी अर्थशास्त्र ही नवी शाखा निर्माण केली. अर्थशास्त्रज्ञ पिगू यांना कल्याणकारी अर्थशास्त्राचा जनक मानले जाते. प्रो. पिगूच्या आधी जरी मार्शलने कल्याणकारी अर्थशास्त्राचा अभ्यास केला असला तरी त्यांनी व्यक्तीच्या संपत्तीचा आणि आनंदाचा एवढाच अभ्यास केला होता. वास्तवात कल्याणकारी अर्थशास्त्राची सुरुवात प्रो. ए.सी. पिगूपासून झाली म्हणजेच नवसनातनवाद्यांपासून झाली. अर्थात, यापूर्वीचे अर्थशास्त्रज्ञ कल्याणासाठी समाधान असा शब्द वापरीत असे पण कल्याण हा शब्द पिगूने लोकप्रिय केला. अर्थशास्त्रज्ञ पिगूने कल्याणकारी अर्थशास्त्राची संकल्पना त्याच्या 'Economics of Welfare' (कल्याणाचे अर्थशास्त्र) या पुस्तकात मांडली.

मार्शलने अर्थव्यवस्थेचा विभागशः क्रमा-क्रमाने विचार केला. पिगूने समग्र अर्थव्यवस्थेचा विचार केलेला दिसतो. मार्शलने आपले लक्ष कल्याणातील काहीश मोठ्या प्रमाणावरील बदलांवर केंद्रित केले. पिगूने अल्पांशाने होणाऱ्या बदलांचा विचार केला. मार्शलने साहजिकच अंशात्मक लाभाधिक्य कल्पना उपयोगात आणली. पिगूने 'सीमांत साधनांचा' (Marginal Apparatus) आश्रय घेतला.

पिगूची कल्याणाची कल्पना 'उपयोगिता' या संकल्पनेवर आधारित आहे. त्यांच्या मते, 'व्यक्तींना वस्तूच्या उपभोगातून किंवा उपयोगातून जी उपयोगिता मिळते ते म्हणजे कल्याण होय. त्यामुळे समाजातील भिन्न व्यक्तींना मिळणाऱ्या उपयोगितेची बेरीज म्हणजे सार्वजनिक कल्याण होय. थोडक्यात पिगूच्या मते, वस्तू किंवा सेवांच्या उपभोगातून मिळणारे समाधान म्हणजे कल्याण होय. आर्थिक कल्याणाचे निर्देशक (Indicator) राष्ट्रीय उत्पन्न आहे. यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाल्यास कल्याणात वाढ होते आणि राष्ट्रीय उत्पन्नात घट झाली असता कल्याणात घट होते. मात्र यासाठी समाजातील या उत्पन्नाचे वितरण कायम असावे लागते. महत्तम कल्याण साध्य करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नात वाटप समान होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जर राष्ट्रीय उत्पन्नस्थिर असेल तर श्रीमंतांकडून गरीबांकडे उत्पन्नाचे स्थलांतर केल्याने सुधारणा होते.

पिगूने महत्तम कल्याणासाठी, प्राप्त साधने व तंत्रविज्ञान यांच्या चौकटीत राष्ट्रीय उत्पन्नाची सर्वोच्च पातळी गाठण्याची आवश्यकता अशी प्रतिपादन केली. तसेच उपलब्ध राष्ट्रीय उत्पादनाचे विभाजन संपूर्ण समतेच्या पायावर झाले पाहिजे असाही आग्रह धरला. हा आग्रह दोन गृहीतांवर अवलंबून आहे. १) व्यक्तींची उपभोग क्षमता सारखी असल्यामुळे आंतर वैयक्तिक उपयोगितेची व भिन्न परिस्थितीत प्राप्त होणाऱ्या समाधानासंबंधीच्या कल्पनेची तुलना करता येते. २) द्रव्यरूप उत्पन्नाला घटत्या सीमान्त उपयोगितेचा नियम लागू पडतो. त्यामुळे श्रीमंताकडून त्या मानाने गरीब असलेल्या लोकांकडे पैशाचा ओघ वळविला गेला तर गरीबांच्या समाधानात होणारी

वाढ, श्रीमंतांच्या समाधानात होणाऱ्या हानीपेक्षा अधिक असल्याने कल्याणवृद्धीकारक होते. मात्र अशा पुनर्वाटणीमुळे उत्पादक प्रसन्न, उपक्रमशीलता व भांडवल विकास कुंठीत होता कामा नये. पुनर्वाटणीच्या ओघात सर्व व्यक्तींचे उत्पन्न समान झाले की, प्रत्येकाच्या उत्पन्नाची सीमान्त उपयोगिता सारखी होऊन होऊन महत्तम सामाजिक कल्याण पूर्ण होते.

### प्रा. अमर्त्य सेन – कल्याणकारी अर्थशास्त्र (Welfare Economics) :-

आज जगात नोबेल पारितोषिक हे सर्वोच्च बहुमानाचे मानले जाते. अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळविणारे प्रा. अमर्त्य सेन हे पहिले भारतीय व पहिले आशियाई अर्थतज्ञ ठरले आहेत. १४ ऑक्टोबर १९९८ रोजी 'रॉयल स्वीडिश ॲकॅडमीने' प्रा. अमर्त्य सेन यांना 'कल्याणकारी अर्थशास्त्रातील' योगदानाबद्दल नोबेल पुरस्कार जाहीर केला. अशा महान अर्थतज्ज्ञाचा जन्म ३ मे १९३३ रोजी रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनमध्ये झाला. अमर्त्य सेन यांच्या वडिलांनी विनंती केल्यामुळे स्वतः रवींद्रनाथ टागोरांनी सेन घराण्याच्या या कुलदिपकाचे नाव अमर्त्य सेन असे ठेवले. त्यावेळी रवींद्रनाथ टागोरांनी "हे नाव विलक्षण असून हा मुलगा एक दिवस असामान्य माणूस म्हणून नावारूपाला येईल" ("Its an outstanding name. I can see the boy will grow into an outstanding person") असेही उद्‌गार काढले आणि टागोरांची ही भविष्यवाणी खरी ठरली. तसेच त्यांना 'मास्टर ऑफ ट्रिनिटी कॉलेज, केंब्रिज' हा बहुमान मिळाला.

### कल्याणकारी अर्थशास्त्र (Welfare Economics):-

प्रा. अमर्त्य सेन यांनी कल्याणकारी अर्थशास्त्राचा महत्त्वपूर्ण विचार मांडला. या संदर्भात त्यांचा 'Choice and Social Welfare' हा प्रथम श्रेणी ग्रंथ महत्त्वाचा ठरतो. अर्थशास्त्राला नैतिकतेचे एक परिणाम लाभले व त्यामुळे कल्याणकारी अर्थशास्त्राला तत्त्वज्ञानाच्या पातळीवर नेऊन पोचविण्याची महत्त्वाची कामगिरी त्यांच्या हातून घडली. त्यांनी 'सामाजिक निवडीचा सिद्धांत' मांडून कल्याणाच्या अर्थशास्त्रात मोलाची भर घातली.

### आर्थिक धोरण, विकास व कल्याण :-

आर्थिक धोरण माणसासाठी असले पाहिजे त्याच्या चांगल्या जगण्यासाठी असले पाहिजे. म्हणजेच रोजगार हा आर्थिक धोरणाचा गाभा आहे. माणसाकडे दुर्लक्ष करून त्याच्या हाताला, बुद्धीला काम न देता संपत्तीची वाढती निर्मिती करणे हे अनाकलनीय आहे. भयानक तसेच उद्वेग जनक आहे. म्हणून एक चिरंतन सत्य उरते ते असे की, सर्व प्रकारच्या सन्मानजनक रोजगाराला प्रोत्साहन, संवर्धन आणि संरक्षण देण्यासाठीच आर्थिक धोरण राबविले गेले पाहिजे. रोजगार हेच आर्थिक धोरणाचे दिशादर्शकक सूत्र असले पाहिजे. म्हणूनच अमूर्त विचार प्रक्रियेच्या पातळीस जबरदस्त प्रतिभेच्या बुद्धिमंत विचारवंतांनी रोजगार हा अर्थशास्त्राच्या आर्थिक धोरणाचा गाभा मानला आहे. आर्थिक धोरण म्हणजे पूर्वनियोजित आर्थिक उद्दिष्टांसाठी उपलब्ध आर्थिक साधन सामाजिक निश्चित कालावधीत कसा व किती वापर करायचा या संबंधीच्या आर्थिक योजना व आर्थिक कार्यक्रमाचे संयुक्त विधान म्हणजे आर्थिक धोरण होय. सर्वांना पुरेसा रोजगार प्राप्त करून देणे यातूनच खरे कल्याण साधते हे निश्चित आहे.

प्रा.डॉ.जे एफ. याबाबत विचार मांडतात की, आर्थिक धोरण सर्वसामान्य माणसाच्या रोजगारासाठी हेच सूत्र निर्माण होते. ज्या धोरणात उपलब्ध अनुष्यबळाला पूर्ण रोजगार देण्याचा आटोकाट व प्रामाणिक प्रयत्न नसतो. ते आर्थिक धोरण व ते ठरविणारे धोरणकर्ते बेजबाबदार म्हणून समाजाचे गुन्हेगारास मानले पाहिजे.

### भारतातील संत विचार व परंपरा :-

संपूर्ण जगामध्ये संत ही संकल्पना खूप व्यापक अर्थाने उपयोगात आणली जाते. आचरण हे धर्मलक्षण असून सदाचार हे संताचे लक्षण आहे. भारत = 'भा' म्हणजे ज्ञान व 'रत' म्हणजे सेवा. ज्ञानाची सेवा करणारा असा हा परमपवित्र भारत देश आहे. येथे हजारो ऋषी मुनींनी व साधुसंतांनी जन्म घेतला आणि सर्व जगाला परमार्थाचा मार्ग सांगितला. भारतातील संत विचार व परंपरांचा आढावा घेताना इ.स. च्या ११ व्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत भारतात सर्वच प्रांतातून अनेक श्रेष्ठ संत होऊन गेले, यात रामानंद, नरसी मेहता, मिराबाई, नानकदेव, गोविंदसिंह, कबीर, तुलसीदास, सुरदास, श्रीकृष्णचैतन्य, शंकरदेव, कणकदास, श्रीहरीतीर्थ, श्रीपादरॉय, वादीराज, व्यासराम, पुरंदरदास, पेयाळवार, कुलशेखर, अंदाल, तिरूपान, तिरुवल्लूवर, संत त्यागराज, श्री. नारायणगुरू, संत बसवेश्वर इ.चा. समावेश होतो.

**महाराष्ट्रातील संत :-**

महाराष्ट्रातील संत परंपरा ही निवृत्तीनाथपासून निळोबापर्यंत मानली जाते. या परंपरेस ज्ञानदेवाची प्रभावळ म्हणून ओळखले जाते. निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई ही चार भावंड याच प्रभावळीत येतात. गावगाड्यातील बलुतेदार व अलुतेदार यामधून महाराष्ट्रातून संत परंपरा उदयास आलेली आहे. प्रामुख्याने नामदेव, जनाबाई, चोखामेळा, गोराकुंभार, सेना न्हावी, नरहरी सोनार, कान्होपात्रा, एकनाथ, तुकाराम, बहिणाबाई व निळोबा इत्यादींचा समावेश होतो. महाराष्ट्रातील संतपरंपरा ही वारकरी संप्रदाय म्हणून ओळखली जाते. संतांनी भक्ती ही जीवननिष्ठा मानली आहे. सर्व संतांचे प्रमुख भक्तीस्थान पंढरपुरचा विठ्ठल आहे. या सर्व संतांनी समाजात राहणाऱ्या मानवाच्या कल्याणाचा विचार केलेला असून विश्वव्यापक अशी त्यांची भूमिका आहे. संतांनी दिलेली शिकवण प्रामुख्याने माणसामधील असणारी दुष्टवृत्ती-दुर्गुण वाईट असतात, माणसे वाईट नसतात म्हणून ती दुष्ट प्रवृत्ती दुर्गुण नष्ट व्हावेत असा संतांचा अट्टाहास आहे. संत हे समाजाला दुष्ट प्रवृत्तीकडून सहज प्रवृत्तीकडे, दुराचाराकडून सदाचाराकडे, दुर्गुणांकडून अंधाराकडे, अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारे खरे दृष्टे महापुरुष होते.

**संतांचे निवडक अभंग व ओव्या :-**

या ठिकाणी एक महत्त्वाची गोष्ट उल्लेखिल्याशिवाय राहवत नाही ती अशी की, दि. १२/१२/२०१०, निलंगा बसस्थानाकातील मंदिरात साई बाबांच्या मूर्तीची स्थापना गुरूवर्य उज्ज्वलानंद महाराजांच्या हस्ते करण्यात आली. "अवतार तुम्हा धराया कारण" या अभंगावरील कीर्तनातून गुरुदेवांनी एक खंत व्यक्त केली. श्रद्धा सबुरी हा संदेश देणारे सदगुरू साईबाबा जे 'सबका मालिक एक' हा संदेश देतात, जातीविरहित अवतारी अवलीयांमध्ये त्यांनी गणना करावी लागेल. त्याच्याच बरोबरीने अक्कलकोटचे स्वामी समर्थ, गजानन महाराज यांची जात कोणती हे कोणासही माहीत नाही. भक्ती, धर्म महत्त्वाचा असून जातीच्या कोंदनात संतांना बांधू नका, नरहरी सोनार, सावता माळी, सेना न्हावी या सर्व संतांनी जात पाहून त्याच जातीच्यालोकांनी त्यांची मानवंदना करावी म्हणून संतांची गळचेपी करण्याचा हा प्रकार आहे. माणूस महत्त्वाचा असून हाच त्याचा धर्म व जात आहे. संतांना वेगळी कशी कोठलीही जात माहीत नाही, आज मात्र पहावे तिकडे ते क्षेत्र कोणतेही असो, राजकारण, समाजकारण, अर्थकारण सर्वत्र जात आणि जातीतील जातीचेच म्हणून संत असे नको आहे. आपण काय करतोय याचे भान ठेवा. भेदभाव संतांना मान्य नाही हे ध्यानात ठेवा. संतांची शिकवण ही बहुमोलाची व सर्वसमावेशक सर्वांच्या कल्याणाशी संबंधित असते हे समजून घ्या. संत सर्वांचे हित कल्याण कशाने होईल याचाच ध्यास घेऊन रात्रंदिवस तळमळणाऱ्या लाभविण प्रिती करणाऱ्या माऊलीची जात आहेत हे विसरू नका, त्यांना जातीच्या कोंदनात असे बांधण्याचा प्रयत्न करणे अतियोग्य आहे, त्यांची विश्वव्यापक दृष्टी ध्यानात घ्या.

संतांनी विश्वव्यापक कल्याणाचा विचार केला याचीच प्रचिती पुढील संत वेच्यावरूनही येते. त्यातच त्यांचे अर्थशास्त्रही दडले आहे. गरज आहे ती शोधक दृष्टीची.

**संत नामदेव :-**

संत ज्ञानेश्वर व इतर मंडळीच्या आग्रहाने पहिली तीर्थयात्रा त्यांच्या समवेत केल्यानंतर चारतीर्थयात्रा संत नामदेवांनी एकल्याने केल्या व जवळपास अर्धे आयुष्य भ्रमंतीत घालविले. हलबलांना हतबलतेच्या गर्तेतून बाहेर काढले व योग्य दिशा दाखवत. जीवनविषयक सर्व मूल्यांचा पुर्नविचार किला. नामदेवांनी उत्तरेस जाऊन गुरुनानकांच्या कार्याचे बीजारोपण केले. मानवतावादी दृष्टिकोनातून हिंदू-मुसलमानांची हृदये जोडण्याचा प्रयत्न केला. नामदेवांचे जीवन म्हणजे प्रयत्नवादाचे मुर्तिमंत उदाहरण होय. भक्ती प्रचारासाठी त्यांनी त्या काळातील लोक सरस्वतीत, म्हणजे हिंदी भाषेत रचनात केली आणि आयुष्यभर आपली यात्रा चालू ठेवली, संत नामदेवांना ज्ञानेश्वरांनंतर चौपन्न वर्षे आयुष्य लाभले. हा महापुरुष श्रीवरेच्या तटावरून उत्तरेस गेला. समाज संघटित व जागृत केला. हिंदू मुसलमानांच्या भावनात्मक एकतेसाठी आवाहन केले. मानवी समतेचा पुरस्कार केला. पुरोगामी दृष्टीच्या नामदेवांची शिकवण कर्तव्यनिष्ठेला व सामाजिक नीतीमत्तेला पोषक आहे, आंतरमुक्त बनून मन खंबीर व सुसंस्कृत करण्याचा संदेश दिला. हे जनतेला समजावून दिले. अर्थात जनतेचे दरिद्री बाह्य जीवन संत नामदेवांनी सुसह्य केले. सामान्य जणांचे आंतरजीवन आनंदमय केले. भक्तीचा भव्य आदर्श उभारून लोकांत जीवननिष्ठा उत्पन्न केली. विशुद्ध नैतिक वर्तनाचा अभंगाद्वारा वस्तुपाठ दिला. जनतेच्या ऐहिक जीवनासाठी उपयोगाची सदाचार संपन्नता शिकवली. परमार्थाबरोबर भौतिक अभ्यूदय साधण्याचा उपदेश केला. ऐहिकाच्या उत्कर्षासाठी संसारात अलिप्तपणे, अभिमानाने कसे राहावे याची शिकवण दिली. संपूर्ण मानवजातीला हिताच्या गोष्टी सांगितल्या.

हिताचिया गोष्टी सांगू एकमेका । शाकेमाहे दुःखा। निरसूं तेणे।।१।।
एकमेकां करू सदा सावधान। नामी अनुसंधन तुटो नेदू।।२।।
विठ्ठल नाम व पिढीजात व्यवसायाची सांगड
मन मेरे गजू जीव्हामेरी फाशी। मपिमपि काटि जनमकी फाशी।।१।।

कहा करू जाति कहां करू पाती। राम को जपो दिन और राती।।२।।
या रामबीन राघो शिव बिन शिवा। राम नाम बिन वाही न जीवो।।३।।
म तो भगति करू हरि के गुण गाऊ।। आठ प्रहर आपणा खसमकू त्यागू।।४।।
शोने की सुई रूपे का धागा। नामा का चित्त हरसू लगा।।५।।

अष्टौप्रहर स्वामी नाम ध्यानासह प्रार्थना मग्न कार्यमग्न नामदेव, सोण्याची सुई रूप्याचा दोरा, श्रीहरीसी एकरूप झालेले नामदेवांचे मन अभंगवाणीतील परमार्थ विचार अर्थात संत नामदेवांचे शिंपीकाम परमार्थसाधनेतही अखंड चालू आहे. सुखे संसार करावा। माजी विठ्ठल आठवावा।। असा हा संत नामदेवांचा अनसक्त प्रपंचयोग आहे. विठ्ठल भक्तीचा वडिलोपार्जित वारसा. नामदेवाचं मन म्हणजे एक गज तीन फुटी मापदंड आहे. जीभ ही एक कात्री आहे. गजाने माप घेऊन कात्रीने जन्म मरणाचा पाश कापूनन टाकीन असे असताना जातीपातीचा विचार कशाला करायचा 'न लगती डोंगर चढावे। हळूच पाऊल धरावे।।'

**संत एकनाथ :-**

पितर श्राद्धाच्या दिवशी आपल्या घरी अंत्यजांना जेवू घातले, उनात तळमळणारे महाराचे मुल कडेवर घेऊन त्याच्या घरापर्यंत पोहाचते केले. राणू महाराच्या घरी सर्वांसमक्ष जेवण केले. आपल्या अंथरुणावर वडर झोपला. अशारितीने रूढ जातिनिर्बंध झुगारून दिले. वारकरी संप्रदायाचे पुनरूज्जीवन आणि पुनर्घटण केले, संत एकनाथांनी जीवनभर जे कार्य केले ते कार्य आदर्श भक्तीचे एक उदाहरण होय.

आनंद करूनि संसारी असावे। नाम आठवावे श्री रामाचे।।१।।
'षीमुनी सिद्ध संत महानुभाव। रामनामे भवसुखे ककेला।।२।।

नामस्मरणासह कर्माने आनंद सुखाचा लाभ होतो तर नामाशिवाय काहीही केले तरी ते व्यर्थ ठरते. म्हणून जे जे काही कराल ते नामस्मरणासोबत करा म्हणजे सुख-दुःखे दूर होतील. सुख-दुःख भाव निघून जातो. संसारीचा आनंद द्विगुणित होऊन संसार हा संसार न राहता परमार्थाचे रूप धारण करतो.

चोरी, हिंसा, असत्य, ढोंगीपणा (दंभ), काम, क्रोध, गर्वपिडा, धनमत, भेद, वैर, अविश्वास, स्पर्धा, द्युत आणि मद्यपान या संपत्तीच्या पंधरा अनार्थाचा सविस्तर मागोवा घेऊन अर्थाच्या योग्य विनियोगाअभावी ते अनर्थ घडतात हे एकनाथी भागवताच्या २३ व्या अध्यायातून सविस्तर विश्लेषण केले आहे.

संत एकनाथांच्या व्यक्तीमत्त्वातील अष्टपैलू हे विस्मयकारक आहेत. पापद्रव्य जोडू नये या संदेशाबरोबरच संत एकनाथ जीवनाच्या सुख संपन्नतेसाठी स शाश्वत कल्याणासाठी कशाकशाची अत्यावश्यकता आहे. याचा ऊहापोह पुढील नीती प्रकरणातून करतात.

निती

निती सांगतो ऐका एक। दास सभेचा सेवक। मन टाळू नका एक। कोणी एक।।धृ।।
सांडावरून जाऊ नये। लाच खाऊ नये। चोहट्यात राहू नये। कोणी एक।।१।।
अक्रीत घेऊ नये ।। कोणी एक।।२।।
सज्जनांशी विटूं नये। नीचासवे बाटूं नये। तस्कराशी पुसू नये।। कोणी एक।।३।।
भक्तिमार्ग सांडू नये। कुभांडचासी तंडू नये। खळासंगे भांडू नये। कोणी एक ।।४।।
सत्पुरुषांशी छळू नये। शिवेचा गुंडा ढाळू नये। केला नेम टाळू नये। कोणी एक ।।५।।
सदगुरुसेवा सोडू नये। कुळधर्मासी मोडू नये। पापद्रव्य जोडू नये।। कोणी एक ।।६।।
संपत्ति आलिया माजू नये। अभिमाने फुगे नये। सभा देखून लाजू नये। कोणी एक ।।७।।
असत्यवाद करू नये। खोटा संग धरू नये। मोचकाशी मैत्री करू नये। कोणी एक ।।८।।
भलते भरी पडूं नये। अनाचार करू नये। कपट मनी धरु नये। कोणी एक ।।९।।
जन्मा आलीया स्वभावे। काही सार्थ करावे। ऐसे मनी विचारांवे। कोणी एक ।।१०।।

गरीब, दरिद्री, दुर्बळाच्या मुलीशी समर्थाने जर विवाह केला तर त्या मुलीचे दारिद्रय संपते, अर्थात ईश्वर नामचिंतनाचेही असेच आहे.

दुर्बळाची कन्या समर्थाने केले। अवदसा निमाळी दरिद्राची।।
पूर्ण परमार्थाची मागणी करताना संत एकनाथ म्हणतात
संसार मज न करणे सर्वथा। परमार्थपूरता हाती देई।।१।।
जनार्धनाचा एका करूना वचनी। करी विनवणी पाया पाशी।।२।।

विंचू या रूपकातून संत एकनाथ मनुष्य इंगळी अति दारुण असून त्या इंगळीने नांगा मारल्यामुळे सर्वांगाला त्या इंगळीची वेदना होत असून तिला उतरविण्यासाठी तमौगुण मागेसारण्याची गरज आहे. तमोगुण दूर करण्यासाठी सत्वगुणाचा अंगारा लावल्यास विंचू इंगळी झरकन, उतरेल. सत्व उताऱ्याने अवघा तमोगुण सोडण्यासाठी सत्वाचा अंगारा लावावा लागेल. सत्वगुणांच्या अंगीकाराने तमोगुण बाजूला होऊन कल्याण साधते असा विचार जनाच्या मनीमाणसी उतरविला.

**माणसाला जगायला काय लागते?**

जगायला काकय लागते याचे उत्तर महात्मा गांधी नावाच्या भारतीय महामानवाने अन्न, वस्त्र, निवाऱ्याची खरी किती गरज आहे याचे धडे स्वतःच्या आचरणाने घालून देण्याचा प्रयत्न केला होता. या मांडणीला छेद देणारी एक स्वातंत्र्योत्तर पिढी त्यांच्याच आश्रयाने मोठी होत होती. जगायला काय लागते? खरा प्रश्न आहे तो माणसाला एखादी गोष्ट किती लागते? म्हणजे तत्त्वज्ञानाचा आसरा सोडला तरी तुम्ही करोडपती असोकी भिकारी भूकेसाठी लागणारे अन्न तेवढेच लागणार अर्थात कोणाचीही भूक आर्थिक परिस्थिती सापेक्ष नसून ती शरीर सापेक्ष आहे, हे झाले भूकेबद्दल, भूकही नैसर्गिक गोष्ट आहे. ती शरीराच्या अवस्थेवरच अवलंबून आहे. हव्यासाची गोष्ट मात्र निराळी आहे. हव्यास ही वेगळीच गोची आहे. परिस्थिती, वय, रंग, आरोग्य, उंची आणि लिंग सापेक्ष अशी ती नाही, मुळात भूक या कशावरच अवलंबून नाही. पोटाची भूक ही गरज एकदा भागली की मग अनंतपणे सुरू असणारी गोष्ट म्हणजे हव्यास, अलीकडील काही वर्षांपासून हव्यास ही एक मानसिक आजारपणाची अवस्था निर्माण झाली आहे. यावर जगातल्या सर्व समाजशास्त्रज्ञांचे, मानसोपचार तज्ज्ञांचे एकमत झाले आहे. आज जागतिकीकरणाच्या या सगळ्याच व्यापात फक्त हव्यासाने जगणारी एक नवीनच जमात तयार झाली आहे. जी धर्म, राष्ट्रसापेक्ष नाही, त्यामुळे हा जगाच्या चिंतेचा विषय आहे. माणसाला जगण्यासाठी आवश्यक जी गोष्ट ती त्याची योग्य खरी गरज होय, अशी ही गरज नाही भागल्यास माणसाचे जगणे धोक्यात येऊ शकते.

अन्न संदर्भात भूक ही शारीरिक संवेदना या गरजेस उद्युक्त करते. यावरून असे म्हणता येईल की, भूक भागली की ही गरज संपायला हवी. पण तसे होत नाही. पुढे या गरजेचा विस्तार किमान भुकेला ओलांडून पुढे जाऊ लागला. हाच तो हव्यास, हव्यासाची प्रथम अवस्थाही भुकेची शेवटची पायरी असते.

जे अन्नाचे तेच इतर गोष्टींच्या हव्यासाचे परिणामी मग हव्यास अनेक कारणांनी ज्यात साधने संपण्याची भीती, दुसऱ्याशी होणारी तुलना, श्रेष्ठत्वाची लढाई, प्रतिष्ठेच्या कल्पना अशा अनेक भुकेशी संबंधित नसणाऱ्या गोष्टींनी हव्यासाचा प्रचंड विस्तार होत राहतो. आपण किती जगू याची कोणतीही खात्री नसताना पुढच्या पिढ्यांच्या जगण्याची तरतूद करण्याच्या भंपक गोष्टी करतो. पुढे हा हव्यास इतरांना त्यांच्या जगण्याची गरज सुद्धा भागवू देत नाही. इतक्या अमानुष पातळीवर जाऊन पोहोचतो. भुकेचे हव्यासात जसे सहजपणे रूपांतर होते तितक्याच नकळतपणे हा हव्यास इतरांना त्यांचया गरजा नाकारण्याच्या गुन्ह्यांपर्यंत आपली वाटचाल करतो.

**निष्कर्ष :-**

१. संपूर्ण भारतामध्ये संत होऊन गेले. त्यांनी बुवाबाजीचे प्रदर्शन टाळून मानवाच्या वास्तव कल्याणाचा विचार केलेला आहे.
२. धन कल्याणकारी आहे खरे परंतु टिकावू आणि सर्वस्वी आहे असे मात्र म्हणता येणार नाही. कारण धनाला खऱ्या व्यवहाराची जोड व त्याचा योग्य विनियोग असेल तरच त्या धनाने टिकावू कल्याण साधता येईल.
३. सर्वांगीण कल्याण साधावयाचे असेल तर सर्व इंद्रियांच्या ठिकाणी विवेक कार्यरत व्हावा लागेल. त्यामुळे प्रत्येक कर्म हे डोळसपणे पार पडेल व जे जे करू ते केले जाणार नाही जे जे करायलाच पाहिजे ते ते साध्य होईल हे ज्ञानेश्वरांनी सांगितले.
४. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मग ते अर्थकारण, राजकारण, धर्मकारण, समाजकारण, प्रशासन, व्यवस्थापन, व्यापार, शेती, सेवाक्षेत्र, क्षेत्र कोणतेही असो तेथे दैवी गुणसंपदा कार्यरत असेल तर सर्व अहित बाजूला सारले जाऊन हित साधले जाईल. शाश्वत विकास व कल्याण साधण्याची खरी वास्तव शक्ती या दैवी गुणसंपदेत एकवटलेली आहे.
५. ज्ञानवैराग्यासह दया, क्षमा, शांती ही दैवी संपदा नवविद्या भक्तीची कृपा आहे. यामुळे मानवाचे कल्याण तर होतेच होते व धनसंपत्तीला दैवी संपदांची सोबत असेल तर सर्व कार्य पूर्णत्वाला जातात व कार्यसिद्धी होते.
६. संत एकनाथांनी नीती प्रकरणाच्या माध्यमातून संपूर्ण मूल्यांची उधळण केलेली आहे. म्हणजेच ते म्हणतात. कोणाचेही मन टाळू नये. लाच खावू नये. योग्य मोबदल्याशिवाय अधिक काही घेऊ नये. प्रामाणिकपणा सोडू नये. इतरांशी नेहमी कृतज्ञ राहावे. सज्जनांशी नेहमी प्रांजळ राहावे.

७. नामदेव हे शिंपी समाजातील थोर संत असून त्यांच्याकडे विठ्ठलभक्तीचा वडिलोपार्जित वारसा लाभलेला होता. परमार्थ साधनतेही मन लावून शिंपीकाम उत्कृष्टरित्या चालू ठेवले. सुखाने संसार करण्याबरोबर परमेश्वरांशी अनुसंधान साधून अनासक्तप्रपंच योग संत नामदेवांनी साधला.
८. सर्वच संतांनी वर्णाश्रमधर्माचे महत्त्व मान्य केले असले तरी भेदासाठी वर्णाश्रमधर्म महत्त्वाचा नसून तो आपापल्या धर्मानुसार वाट्यास येणारी कर्तव्ये निपुणतेचे करण्यासंदर्भात वर्णाश्रमधर्माचे पालन महत्त्वाचे मानले हे लक्षात घ्यावे लागेल. त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न निर्माण होणार नाही. वर्णाश्रमधर्मानुसार कर्म करण्याने स्वधर्म पालन होऊन आपल्या सर्व गरजांची पूर्तता होते.
९. भक्तीचा सत्यार्थ न कळलेला मनुष्य सर्व प्राण्यांशी निर्दयपणाने वागतो. सर्वच संतांची ही भूमिका विश्वात्मक स्वरूपाची आहे.
१०. भक्तीने यशाचा योग्य मार्ग सापडतो. भक्तीने यशाचे शिखर गाठता येते. भक्ती म्हणजे कल्याण असून भक्तीशिवाय माणसाचे जीवन दाना नसलेल्या फोलपणाप्रमाणे व्यर्थ आहे. भक्तीशिवाय जीवन लाजिरवाणे असून भक्तीने जीवनाची किंमत वाढून महत्त्व कळते. म्हणून भक्तीला पर्यायच नाही.
११. भक्ती ही सर्व क्षमता व संपदांची प्राप्ती करून देणारी सक्षमता होय. भक्ती म्हणजे खरी साक्षरता होय. भक्ती म्हणजे सद्धासना, सद्बुद्धी, जी सर्व दुर्वासना व दुर्बद्धीचा नायनाट करते अशी सदबुद्धी होय.
१२. सदबुद्धीच्या योगाने आपापल्या विहित कर्मात निपुन होण्यातच भक्तीचे वर्म असून वेगवेगळ्या शब्दांत सांगायचे झाल्यास. भक्ती म्हणजे श्रमप्रतिष्ठा जोपासण्याची कला होय. असा महत्त्वपूर्ण सिद्धांत सर्वच संतांनी मांडला.
१३. परमार्थात परामर्थवृत्ती महत्त्वाची असून संसारात कर्तव्याला महत्त्व आहे. म्हणून परमार्थ वृत्तीने कर्तव्य पार पाडणे म्हणजेही भक्तीच होय. अर्थात परमार्थ वृत्ती व कर्तव्यनिपुणता यांच्या समन्वयाने कल्याण साधते.
१४. स्वार्थ आणि धनाचा हव्यास मानवाला आंधळे बनवितो. त्यासाठी अधिक धनाचा हव्यास न करता आपल्याला लागेल एवढेच धन मिळावावे. दीन-दुबळयांची सेवा करावी. 'मानव सेवा हीच ईश्वर सेवा असून मानव सेवेनेच खरे कल्याण साधते.' असा महत्त्वपूर्ण सिद्धांत सर्वच संत मांडतात.
१५. भक्तीमधून कार्य व कार्यातून कल्याण हे कल्याणाचे सूत्र सर्वच संतांनी मांडले आहे.

## संदर्भ सूची :-

१. प्रा. डॉ. जे. एफ. अर्थदर्शन, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.
२. रा. चि. ढेरे, 'श्री विठ्ठल एक महासमन्वय', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००४.
३. भावे मो. स., 'चंद्रकांत केळकर', मूल्य सिद्धांत, २००४.
४. नलिनी पंडित, 'धर्म शासन आणि समाज', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९९९.
५. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, 'प्रस्तावना' डॉ. हे. वि. इनामदार लिखीत भक्ती मंदिरातील नंदादीप, इंद्रायणी प्रकाशन, पुणे, २०००.
६. गीता प्रेस, गोरखपूर, श्री नामदेवाची अभंग गाथा, १०७९, अभंग क्र. १९६९.
७. गीता प्रेस, गोरखपूर, सकलसंतवाणी, एकनाथ महाराजांचे अभंग, अभंग क्र. ११२९.
८. पंचरत्न हरिपाठ, श्री संत एकनाथ महाराज हरिपाठ, अभंग क्र. २४.
९. गीता प्रेस, गोरखपूर, सकलसंतवाणी, खंड-२, संत एकनाथ महाराजांचे अभंग, अभंग क्र. १७४८.